चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

०९ ऑक्टोंबर, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)

# दुकानातुन मोबाईल चोरी करणारा आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात

## आरोपीकडुन महागडे मोबाईल जप्त

दिंनाक ०९/०९/२०१९ रोजी मोबाईल दुकानदार फिर्यादी नामे जयपाल प्रभुदास डोडानी वय ४६ वर्ष रा. रामनगर चंद्रपुर यांनी पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे रिपोर्ट दिली की, त्यांचे दुकानातील त्यांनी खरेदी केलेले एकुण ४५ मोबाईल असा एकुण ६,११,५००/—रू चा मुद्देमाल दिसुन येत नाही. यावरून पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे अप.क्र. ७८०/२०१९ कलम ३८१, ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा नोंद होताच गुन्हयाचे गांर्भीय लक्षात घेत गेलेल्या मोबाईल बाबत मोबाईल दुकानातील काम करणाऱ्यांना विचारपुस करण्यात आली. सोबतच तांत्रीक बाबीवर सुध्दा बारकाईने लक्ष देण्यात आले. सदर गुन्हयाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा सुध्दा सुरू असल्याने तांत्रीक विश्लेषण आणि दुकानातील कामावरील इसमांना विचारपुस दरम्यान लक्षात आले की, सदरची चोरी ही दुकानातील इसम आरोपी नामे पांडुरंग कन्हयया गेडेकर वय २८ वर्ष रा. ओमनगर भिवापुर वार्ड चंद्रपुर यांनी केली असुन त्यांने ते मोबाईल कमी किंमतीत त्यांचे मित्रांना आणि ग्राहकांना विक्री केले होते. यावरून सदर आरोपीस अटक करून त्यांचे जवळुन एक सॅमसंग आणि २६ नग ओपो कंपनीचे मोबाईल किं. ३,१२,२६०/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपी आणि इतर एका इसमास विचारपुस सुरू असुन आरोपीकडुन गुन्हयातील इतर मोबाईल हस्तगत करणे सुरू आहे.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस अधीक्षक श्री. डॉ. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखा प्रभारी पोनि. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात, पोउपनि विकास मुंढे, सफौ.पंडीत व—हाटे, पोहवा महेंद्र बुजाडे, नापोशि संजय अतकुलवार, अनुप डांगे, पोशि/प्रशांत नागोसे, जावेद सिददीकी, कुंदन बावरी, नितीन रायपुरे यांनी केली.

———————————————————————————————

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# मॉल मधुन चेक चोरी करून सोने खरेदी करणारे आरोपी स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद

पोलीस स्टेशन रामनगर येथे एमडीआर मॉलचे मालक यांनी रिपोर्ट दिली की, त्यांचे एसबीआय अकाऊंन्टचे ५ चेक मॉल मधील त्यांचे कॅबीनमधुन कोणीतरी चोरी करून त्यावर बनावट सही करून त्या चेकद्वारे अमरावती येथुन १०,३७,६८२/—रू किंमतीचे सोने खरेदी केले. यावरून पोलीस स्टेशन रामनगर येथे गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हा हा क्लिष्ट स्वरूपाचा असल्याने याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे देण्यात आला. तसेच पोलीस अधीक्षक यांनी सुध्दा सदर गुन्हयाचे तपासात वेळोवेळी पाठपुरावा व मार्गदर्शन केले. तपासादरम्यान केलेले तांत्रीक विश्लेषण व उपयुक्त माहितीद्वारे सुरवातीस नागपुर येथुन आरोपी नामे १) मोहसिन दाउद कुरेशी वय २० रा. गडड्ीगोदाम नागपुर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली, तर त्यांने आरोपी २) साजीद शफी कुरेशी वय ३५ रा. नागपुर मॅनेजर एमडीआर मॉल हा गुन्हयाचा सुत्रधार असल्याचे सांगीतले. तपास पथकाने लागलीच साजीद यास चंद्रपुर येथुन ताब्यात घेवुन अत्यंत कौशल्यपुर्वक त्यास प्रश्न विचारले व अधिक चौकशी केली असता, साजीद याने गुन्हयाची कबुली दिली. आतापर्यंत केलेल्या तपासात हकीकत समोर आली आहे की, साजीद हा एमडीआर मॉल येथे मॅनेजर म्हणुन काम करतो त्यांने मागील पाच ते सहा महिन्यापासुन गुन्हयाचे फिर्यादी व मॉल चे मालक यांचे संपुर्ण हालचालीवर लक्ष ठेवुन माहिती घेतली यादरम्यानच त्याने नागपुर येथे आरोपी क्र. ३) रिशभ मनोज सोनी वय २० वर्ष रा. सौंसर मध्यप्रदेश क्र. ४) राजन साखरे, रा. नागपुर यांचेशी संगणमत करून गुन्हा करण्याची योजना आखली. रिशभ व राजन यांनी मॉलचे मालक चोरडीया यांचेच नावाने सिम कार्ड खरेदी केले. तसेच साजीद याने त्याकरीता त्या दोघांचे बनावट आधार कार्ड सुध्दा तयार करून दिले. दिनांक ०८/०८/२०१९ रोजीचे पुर्वी आरोपी साजीद याने मॉल मधुन एकुण ५ चेक चोरी करून आरोपी रिषभ, राजन व मोहसीन यांना चेक द्वारे सोने खरेदी करण्याचे सांगीतले. त्यानुसार त्या तिघांनी अमरावती येथील सराफा मार्केटमधुन एकुण १०,३७,६८२ रूपयाचे सोने खरेदी केले. यानंतर आरोपीतांनी आपसात वाटाघाटी केली.

आरोपीतांनी गुन्हा करतांना पुरावा राहणार नाही याची दक्षता घेण्याचा प्रयत्न केला परंतु कायदयाच्या कचाटयातुन कोणताही गुन्हेगार सुटु शकत नाही त्याप्रमाणे पोलीसांनी अतिशय बारकाईने तपास करत गुन्हयाचा छडा लावला. व आरोपी यांनी दिलेल्या कबुलीनुसार त्यांनी खरेदी केलेल्या २५ तोळे सोन्यापैकी २२.५ तोळे सोने आणि ५०,०००/—रू रोख आरोपीकडुन हस्तगत केली आहे. सदर गुन्हयामध्ये दिनांक ०४/१०/२०१९ रोजी एकुण तीन आरोपी अटक असुन राजन साखरे हा फरार आहे.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस अधीक्षक श्री. डॉ. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखा प्रभारी पोनि. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात, सपोनि.जितेंद्र बोबडे, पोउपनि. विकास मुंढे, सचिन गदादे, सफौ. पद्माकर भोयर, पोहवा. भुजाडे, पोहवा बघमारे, पोशि. बल्की, जांभुळे, झिलपे, कुंदन बावरी, नितीन, जावेद यांनी केला.

———————————————————————————————————————

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# दुचाकी चोरी करणारे आरोपीस अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दि. ०६/१०/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस पथक पोलीस स्टेशन रामनगर हददीत पेट्रोलिंग करीत असता, गोपनीय माहीती मिळाली की, बंगाली कॅम्प चौक येथे रेकार्ड वरील गुन्हेगार अतुल उर्फ मुजोर विकास राणा याचे जवळ चोरीची हिरो होंडा स्पलेंडर गाडी आहे. अशी माहीती मिळाल्याने पोलीस पथकासह बंगाली कॅम्प चौक येथे जावून, सापळा रचुन मिळालेल्या माहितीप्रमाणे वरील नमुद इसमास ताब्यात घेवुन विचारपूस केली असता, त्याने सांगितले की, ही गाडी दत्त नगर नागपुर रोड येथून चोरी केली आहे. यावरून आरोपी नामे अतुल उर्फ मुजोर विकास राणा यास अटक करून त्याचे जवळील हिरो होंडा स्पेल्डंर क्रं. एमएच ३४ एएफ ९२७३ जप्त करण्यात आलेली आहे. सदर इसमाची कसुन चौकशी केली असता सदर दुचाकी बाबत पो.स्टे. रामनगर  अपराध क्रं. १२३५/२०१९ कलम ३७९ भादंवि चा गुन्हा नोंद आहे.

तसेच महाकाली मंदीर परीसरात संशयीत ईसम नामे ईश्वर उर्फ टकल्या गजानन परचाके याचे जवळ चोरीची स्कुटी ही गाडी आहे. अशा माहितीवरून पोलीस पथकोन महाकाली मंदीर परीसर येथे जावून, गाडी बददल अधिक माहीती घेतली व ईश्वर उर्फ टकल्या गजानन परचाके याचा शोध घेवून तो स्कुटी क्रं. एमएच ३४ एएन ८४९२ सह मिळाल्याने त्यास विचारपूस केली असता, त्याने सांगितले की, ही गाडी महाकाली वार्ड येथून चोरली आहे. सदर गाडी बाबत रेकॉर्ड चेक केले असता, पो.स्टे. चंद्रपुर शहर अपराध क्रं. ८६९/२०१९ कलम ३७९ भादंवि या गुन्हयातील चोरीस गेलेली दुचाकी आहे तसेच नमुद आरोपी ईसम यास अधिक विचारपूस केली असता, त्याने काही महीन्यापूर्वी ॲक्टीवा मोपेड सुध्दा एकोरी वार्ड येथून चोरी केली होती. ती ॲक्टीवा मोपेड गाडी आरोपीने सांगितल्या वरून महाकाली मंदीर परीसराचे मागील बाजूस उभी केलेली मिळून आली. सदर दुचाकीबाबत पो.स्टे. चंद्रपुर शहर येथे अप. क्र. ८६२/१९ क. ३७९ भादवी प्रमाणे चोरीचा गुन्हा नोंद आहे. वरील तिन मोटार सायकल पैकी रामनगर पोलीस स्टेशन मधील दोन आणि चंद्रपुर शहर पोलीस स्टेशन येथील एक असे एकुण ०३ गुन्हे उघडकीस आले आहे.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस अधीक्षक श्री. डॉ. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखा प्रभारी पोनि. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात, पोउपनि विकास मुंढे, सफौ.पंडीत व—हाटे, पोहवा महेंद्र बुजाडे, नापोशि संजय अतकुलवार, अनुप डांगे, पोशि/प्रशांत नागोसे, जावेद सिददीकी, कुंदन बावरी,  नितीन रायपुरे यांनी केली.

---

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)

# घरफोडी करणारा आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात आरोपीकडुन दोन गुन्हे उघडकीस

दिनांक ०७/१०/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रामनगर पोलीस स्टेशन परिसरात पेट्रोलींग करीत असतांना बंगाली कॅम्प चौक येथे एक सशंयीत इसम संशयीत रित्या हाचलाची करतांना दिसला. व तो पोलीस पथकास पाहुन पळु लागला. पोलीसांनी संशयावरून त्याचा पाठलाग करून ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, सदर इसम हा सराईत गुन्हेगार असुन त्याचे नाव संजुसिंग सुरजसिंग बावरी वय २७ रा. इंदीरानगर चंद्रपुर असे असल्याचे सांगीतले. त्याची कसुन चौकशी केली असता त्यांने दिनांक ०७/०९/१९ रोजी शामनगर चंद्रपुर येथुन चोरी केल्याची कबुली दिल्याने आरोपीकडुन पोलीस स्टेशन रामनगर येथील अप.क्र. ११३५/२०१९ कलम ३८० भादंवि मधील सोने चांदीचे दागीने असा एकुण **२५,८१०/—रू** चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर आरोपीस इतर गुन्हयाबाबत विचारपुस केली असता आरोपीने पोलीस स्टेशन रामनगर येथील अप.क्र. ८८८/२०१९ कलम ४५७, ३८० भादंवि च्या गुन्हयातील सोने चांदीचे दागीने चोरी केल्याची कबुली देवुन त्याने त्याचे कडुन गुन्हयातील एकुण २६,००० रू. चा माल चोरीचा माल हस्तगत करण्यात आलेला आहे. सदर आरोपीकडुन पोलीस स्टेशन रामनगर येथील दोन गुन्हे उघडकीस आले असुन गुन्हयातील ५१,८१०/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस अधीक्षक श्री. डॉ. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखा प्रभारी पोनि. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात, पोहवा. राजेंद्र खनके, पोना. गजानन नागरे, पोशि. जमीर पठाण, मिलींद चव्हाण यांनी केली.

---

# मोबाईल चोरी करणारे अटट्ल आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात

## आरोपीकडुन २३ महागडे मोबाईल जप्त

दिंनाक ०७/१०/२०१९ रोजी स्थनिक गुन्हे शाखेच्या पथकास माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर अप.क्र. ८७३/२०१९ कलम ३७९ भादंवि मधील फिर्यादीचा ओपो कंपनीचा मोबाईल हा आरोपी १) दिपक कालीदास चांदेकर वय १९ २) नईम शेख कलाम वय २३ दोन्ही रा. अंचलेश्वर गेट चंद्रपुर ३) भारत रानु मडावी वय २९ रा. जलनगर वार्ड चंद्रपुर यांचे जवळ असुन त्यांनी आणखी सुध्दा बरेच मोबाईल चोरी केलेले आहे. अशा खात्रीशीर माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तपास चक्रे गतीमान करीत आरोपींचा कसोशीने शोध घेवुन त्यांना ताब्यात घेतले. आरोपीतांना केलेल्या विचारपुस वरून आरोपीतांनी गुन्हयाची कबुली दिली. यावरून सदर गुन्हयातील मोबाईलसह आरोपींकडुन महागडे २३ मोबाईल जप्त करण्यात आले आहे.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस अधीक्षक श्री. डॉ. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखा प्रभारी पोनि. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात पोहवा. धनराज करकाडे, पोशी रविंद्र, गोपाल, अमोल, संजय वाढई यांनी केली.

---